# प्रेसनोट

लाप्रवि वाशिम

दि.०२.०२.२०२३

आरोपी क्र.१)आलोसे विनोद दत्तात्रय चित्तकवार,पोलीस नाईक पो.स्टे.अनसिंग दुरक्षेत्र उकळीपेन रा.पार्डी टकमोर ता.जि. वाशिम आरोपी क्र.२) तुळशीराम काशीराम लोखंडे वय ४३ वर्ष पद पोलीस पाटील ग्राम सुकळी मुळ रा.सुकळी ता. जि वाशिम. आरोपी क्र.१ यांनी लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शवील्याने तसेच आरोपी क्र.२ यांनी १५०००/– रु लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत.

| | |
|---|---|
| आरोपी नाव हुद्दा,व पत्ता | आरोपी क्र.१)आलोसे विनोद दत्तात्रय चित्तकवार,पोलीस नाईक पो.स्टे.अनसिंग दुरक्षेत्र उकळीपेन रा.पार्डी टकमोर ता.जि.वाशिम आरोपी क्र.२) तुळशीराम काशीराम लोखंडे वय ४३ वर्ष पद पोलीस पाटील ग्राम सुकळी मुळ रा.सुकळी ता.जि वाशिम. |
| लाचेची स्विकारली रक्कम | १५०००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना त्यांचे विरुध्द दाखल गुन्हयात मोठी कारवाई न होवु देने तसेच अटक होवु न देणे या करीता... |
| सापळा अधिकारी | गजानन आर.शेळके पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम |

दि.०१.०२.२०२३ रोजी तक्राददार पुरुष वय ३७ वर्ष व्यवसाय शेती यांनी तक्रार दिली की तक्रारदार यांचे विरुदध पो.स्टे.अनसिंग येथे दाखल गुन्हयात मोठी कारवाई न होवु देने तसेच अटक होवु न देणे या करीता यातील आरोपी क्र. २ पोलीस पाटील तुळशीराम लोखंडे ग्राम सुकळी यांनी तक्रारदास दि.०१.०२.२०१३ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान १५०००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदर कार्यवाही दरम्यान १५०००/– रुपये हे पोलीस अंमलदार यांना देण्याचे पोलीस पाटील यांनी सांगीतले वरुन दि.०२.०२.२०२३ रोजी पडताळणी कार्यवाही क्र२ ही केली असता सदर पौलीस चौकी ही बंद असल्याकारणाने तसेच पोलीस पाटील यांनी ०३.०० वा पावेतो पैसे देण्याचे सांगीतल्याने दि.०२.०२.२०२३ रोजी सापळा कार्यवाही करण्याचे ठरले. व तक्रारदारास सुचना दील्या की पैसे देतांना पोलीस पाटील यांना फोन स्पिकरवर ठेउन पोलीस अंमलदार चित्तकवार यांचेशी बालेणी करावी.त्याप्रमाणे तक्रादार यांनी पैसे देण्या अगोदर पोलीस पाटील लोखंडे यांस पोलीस अंमलदार चित्तकवार यांना फोन लावण्यास सांगीतला व पोलीस अंमलदार यांनी लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली तसेच पोलीस पाटील लोखंडे यांनी लाच रक्कम १५०००/– रुपये स्विकारल्याने पोलीस पाटील लोखंडे यांना ताब्यात घेतले. पोलीस अंमलदार चित्तकवार हा फरार असुन त्याचे शोधकामी टीम पाठविण्यात आली आहे. दोन्ही आरोपी विरुदध सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक,श्री मारोजी जगताप अपर पोलीस अधिक्षक श्री अरुन सावंत अपर पोलीस अधिक्षक,श्री देविदास घेवारे अपर पोलीस अधिक्षक लाचलुपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांचे मार्गदर्शनात पोलीस उपअधिक्षक गजानन आर शेळके तपास अधिकारी तसेच सापळा कार्यवाही पथक मध्ये पो.नि.महेश भोसले,पोहवा नितीन टवलारकर,विनोद मार्कंडे,राहुल व्यवहारे,पो ना. योगेश खोटे,रवि घरत यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने,खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो वाशिम दुरध्वनी क्रमांक ०७२५२६२३५९३३ टोल फ्री नं १०६४ मोबाईल क्रमांक ९९२१०३८१११ यावर संपर्क साधण्याचे अवाहन गजानन आर शेळके पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम यांनी केली आहे.

उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो वाशिम

2/2/23

(गजानन आर. शेळके)
पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम